Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

/२०२५

**विषय - महात्मा गांधी जयंती निमित्त 'विशेष स्वच्छता' अभियान**

सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवकांना कळविण्यात येते की, महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून **दि. ०१ सप्टेंबर, २०२५ ते दि.३० सप्टेंबर, २०२५** या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठामध्ये **'विशेष स्वच्छता अभियान'** राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१) **विद्यापीठातील सर्व अधिविभाग, अध्यासन, प्रशासकीय विभाग व वसतिगृहे** यांनी

- आपल्या अधिविभाग /विभागाची, वसतिगृहाची अंतर्गत स्वच्छता करावी.
- इमारतीच्या खिडक्या व खिडक्यांच्या काचा आतून बाहेरुन स्वच्छ कराव्यात.
- इमारतीचा सभोवतालचा परिसर स्वच्छ करुन प्लास्टिकमुक्त ठेवावा.
- अधिविभागात सुस्थितीत किंवा वापरात येणारे फर्नीचर/साहित्य विनावापर असल्यास अशा साहित्याची यादी करुन त्यास मान्यता घेवून आवश्यक जडसंग्रह नोंदवहीमध्ये नोंदी घेवून सदर साहित्य दि.३१/१०/२०२५ पूर्वी अभियांत्रिकी विभागाकडे देण्याची कार्यवाही करावी.
- आपल्या अधिविभाग व विभागातील सध्या वापरात न येणारे, निरुपयोगी, कालबाहय झालेले साहित्य व रेकॉर्डबाबत निर्लेखन करण्याची कार्यवाही नियमानुसार करावी.

२) **विभाग प्रमुख, संगणक केंद्र, युसिक विभाग व साठापडताळणी** यांनी ज्या अधिविभागाने साहित्य/उपकरणे निर्लेखन करण्याच्या अनुषंगाने साठापडताळणी विभाग, संगणक केंद्र व युसिक विभागाकडे अभिप्राय/अहवाल मागणी केलेला आहे त्याबाबत संबधित विभागाने तात्काळ अभिप्राय/अहवाल द्यावा.

३) **अभियांत्रिकी विभाग** - यांनी

- अधिविभाग, प्रशासकीय विभाग व वसतिगृहातील स्वच्छतागृह व प्रसाधनगृहांची स्वच्छता ठेवावी. कोठेही पाणी साठणार नाही याची दक्षता घ्यावी.
- सर्व वसतिगृह, उपाहारगृह मधील किचन व गोडावून येथे खराब झालेले एक्झॉस्ट फॅन बसविण्यात यावेत.
- विद्यापीठ परिसरातील सर्व रस्त्यांच्या दुतर्फा असलेले गवत काढावे. व झाडांचे ट्रिमिंग करणे.
- परिसरातील सर्व रस्त्यांवरील खड्डे मुरमाने भरावेत. व रोलिंग करावे.
- सर्व अधिविभाग/प्रशासकीय विभागाने निर्लेखित केलेले साहित्य गोडवूनला ठेवावे.
- ज्या अधिविभागांनी/ वसतिगृहांनी निर्लेखनासाठी किंवा पूनर्वापरासाठी जे साहित्य निर्लेखनांची कार्यवाही पूर्ण करुन अधिविभागात ठेवलेले आहे. ते साहित्य तात्काळ अभियांत्रिकी विभागाने ताब्यात घ्यावे. ज्या साहित्याची किरकोळ दुरुस्ती करुन पूनर्वापर होवू शकतो अशा साहित्याची सविस्तर यादी तयार करुन सर्व अधिविभाग व प्रशासकीय विभागाना देण्यात यावी. तसेच, सदर साहित्याची अधिविभाग व प्रशासकीय विभागाकडून मागणी आल्यास ते त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. याबाबत आवश्यक त्या सर्व नोंदी ठेवण्यात याव्यात.

४) **उद्यान विभाग** - यांनी विद्यापीठ परिसरातील मेक्सिकन सनफलॉवरीची झाडे (विशिष्ट प्रकारची लाल फुलांची झाडे /लाल फुले ) काढावीत.

५) अधिविभाग/विभागाच्या इमारतीच्या सभोवतालच्या परिसराची स्वच्छता करावी. या कालावधीत विभाग/अधिविभाग, व आजूबाजूच्या परिसरात कोणताही कचरा व कचरासदृश्य साहित्य राहणार नाही तसेच सभेवताचा परिसर प्लॅस्टिक मुक्त राहिल यास्तव आवश्यक सर्व कार्यवाही करावी.

उपरोक्त केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (फोटोसह) वरिष्ठांच्यामार्फत आस्थापना विभागास सादर करावा.

(डॉ. व्ही. एन. शिंदे )
**कुलसचिव**

**जा. क्र. आस्थापना/** १८०३
**दि.** 03 SEP 2025
**प्रति,**

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी/विद्यार्थीनीं

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.